# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ६३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.२२ जुलै, २०१४ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ६३ वी बैठक मंगळवार, दि.२२ जुलै, २०१४ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | विभागीय सहसंचालिका, सोलापूर विभाग, सोलापूर | सदस्या |
| ३) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ४) | प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. | सदस्य |
| ५) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ६) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ७) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. देशमुख एम. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. करचे बी. आर. | सदस्य |
| १०) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| ११) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १२) | सौ. मोहिते-पाटील पी. पी. | सदस्या |
| १३) | डॉ. लोणीकर एस. व्ही., प्र. परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १४) | श्री. अनपट एस. बी. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १५) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

डॉ. एम. एस. देशमुख यांची व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशन केल्यानंतरची व्यवस्थापन परिषदेची ही पहिली बैठक असल्याने त्यांचे मा. कुलगुरुमहोदयांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

**अनुपस्थितीः**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्रा. डॉ. पाटील टी. आर. यांनी दूरध्वनीद्वारे व डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. यांनी एस. एम. एस. द्वारे अनुपस्थिती कळविली. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी व प्राचार्य श्री. पवार एस. के. हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

**सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ ०१ ] दि.२४ जून, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठरावः दि.२४ जून, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठराव: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] तक्रार निवारण समितीवरील रिक्त झालेल्या पदावर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: म.वि.कायदा १९९४ कलम ५७ (३) अन्वये तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आलेली आहे. व्यवस्थापन परिषदेतून खालीलप्रमाणे समिती सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले होते.

| | | |
|---|---|---|
| **व्यवस्थापन परिषदेकडून नामनिर्देशन** | Maharashtra University Act 1994 Section 57 (3) (a)(b)- :<br>(a) Pro-Vice Chancellor, where there is no Pro-Vice Chancellor, a member of the Management Council nominated by the Management Council.........................Chairman | **प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर**<br>स्कुल ऑफ केमिकल सायन्सेस, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. |
| | (b) Two members of Management Council nominated by the Management Council from amongst themselves.......Member | **डॉ. टी. एन. शिळीमकर**<br>शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलुज, जि.सोलापूर. |
| | (One of them belonging to the schedule cast or scheduled tribes of De-notified Tribes (Vimukta jatis)/ Nomadic Tribes or other backward classes, by rotation) ...... ....Mamber | **ॲड. श्री. बी. एस. सलगर**<br>सोलापूर. |

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ५७ नुसार गठीत करण्यात आलेल्या तक्रार निवारण समितीवरील रिक्त झालेल्या पदाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | म. वि. कायदा १९९४ तरतूद | पद रिक्त झालेल्या समिती सदस्याचे नाव | पद रिक्त असण्याचे / झाल्याचे कारण |
|---|---|---|---|
| १) | Maharashtra University Act 1994 Section 57 (3) (a) :-<br>Pro-Vice Chancellor, where there is no Pro-Vice Chancellor, a member of the Management Council nominated by the Management Council................Chairman | **प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर**<br>स्कुल ऑफ केमिकल सायन्सेस, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. | **सेवानिवृत्त झाल्याने** |

सबब रिक्त झालेल्या पदावर व्यवस्थापन परिषदेकडून नामनिर्देशन होवून मिळण्याची बाब विचारार्थ).

**ठराव:** **तक्रार निवारण समितीवरील सदस्य ॲड. बी. एस. सलगर यांचे तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षपदी आणि परिणामत: रिक्त झालेल्या त्यांच्या जागेवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यामधून डॉ. एम. एस. देशमुख यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ ०४ ] दंडक ६८ प्रमाणे परिनियम समितीवरील रिक्त झालेल्या जागेवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करण्याबाबत.**

(टिपणी: दंडक ६८(a) प्रमाणे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेने दि.१७/०३/२०११ रोजीच्या बैठकीत डॉ. एस. व्ही. लोणीकर यांचे परिनियम समितीवर अध्यक्ष म्हणून नामनिर्देशन केलेले होते.

डॉ. एस. व्ही. लोणीकर हे नियत वयोमानानुसार दि.३०/०६/२०१४ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. डॉ. एस. व्ही. लोणीकर यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या या जागेवर दंडक ६८(a) प्रमाणे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाचे आहे.

सबब, व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून परिनियम समितीवर नामनिर्देशन होण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: परिनियम समितीवर दंडक ६८ प्रमाणे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून डॉ. बी. आर. करचे व महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या सदस्यांमधून प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ ०५ ] दि.२७/०६/२०१४ च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत (विषय क्र.३ वगळून) मान्यतेसाठी.**

(टिपणी: दि.२७/०६/२०१४ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statute No.S.३२४ नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार वित्त व लेखा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता त्यास दिनांक १०/०७/२०१४ च्या वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस केली आहे. तथापि, खरेदी समितीमधील विषय क्र.३ यास मा. कुलगुरु यांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे विषय क्र.३ वगळण्यात आलेला आहे.

सबब, दि.२७/०६/२०१४ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः दि.२७/०६/२०१४ च्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतातील विषय क्र.३ वगळून इतर विषयाच्या वित्त व लेखा समितीच्या शिफारशी स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**<u>मा.कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषयः</u>**

**[ ६(१) ] मुलांच्या वसतिगृहासाठी प्रभारी रेक्टर यांच्या मानधनात वाढ करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः वसतिगृहातील मुलांच्या वसतिगृहासाठी प्रभारी रेक्टर यांना सप्टेंबर २०११ रोजी रेक्टर निवास देण्यात आलेले असून सध्या रेक्टर म्हणून ते रेक्टर निवासस्थानात वास्तव्य करीत आहे. दि.०७/०७/२०१४ रोजीच्या अर्जानुसार श्री.एस.एन. शृंगारे यांनी रेक्टरचे मानधन हे त्यांना मिळणाऱ्या घरभाडे भत्ता (HRA) इतके मानधन वाढवून मिळावे, अशी विनंती केलेली आहे.

वित्त व लेखा विभाग यांच्या दि.२४/०१/२०१३ रोजीच्या टिपणीन्वये त्यांना शासन निर्णय क्र.घभाभ-१०८८/प्र.क्र.७८/सेवा-५ दि.३० मे, १९८९ अन्वये कर्मचाऱ्यास शासकीय निवासस्थान पुरविण्यात आल्यास त्या कर्मचाऱ्यांस घरभाडे भत्ता अनुज्ञेय नाही. तसेच शासन निर्णय क्र.वाहभ-२००९/८०५/सेवा-५, दि.०५ एप्रिल, २०१० च्या कर्तव्य स्थानापासून एक किलोमिटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थापन आणि निवासस्थान ह्यांच्या एकत्र परिसरात (Campus) शासकीय निवासस्थान पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता अनुदेय असणार नाही.

वरील शासन निर्णयानुसार श्री.एस.एन. शृंगारे यांना वेतनातून देण्यात येत असलेला वाहतूक व घरभाडे भत्याची रक्कम माहे फेब्रुवारी २०१३ पासून बंद करण्यात आलेली आहे.

सबब, मुलांच्या वसतिगृहासाठी प्रभारी रेक्टर यांच्या मानधनात वाढ करण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः मुलांच्या वसतिगृहासाठी प्रभारी रेक्टर यांच्या मानधनात रु.२,०००/- वरुन रु.४,०००/- इतकी वाढ करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ६(२) ] महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७९ अन्वये गठीत केलेल्या वित्त व लेखाधिकारी या पदासाठीच्या निवड समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयास्तव.**

(टिपणी: विद्यापीठात रिक्त असलेले वित्त व लेखाधिकारी हे पद भरण्यासाठी Association of Indian Universities, New Delhi या साप्ताहिकेत, विविध वर्तमानपत्रात, महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.SUS/Estt/०१/ २०१४, दि.०२-०५-२०१४ व मुदतवाढीची जाहिरात क्र. SUS/Estt./०२/२०१४, दि.२९/०५/२०१४ अन्वये प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात आले होते. सदर जाहिरातीस अनुसरुन प्राप्त अर्जांची छाननी करुन, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७९ अन्वये गठीत केलेल्या निवड समितीची बैठक दि.१७/०७/२०१४ रोजी आयोजित करण्यात आली होती. उक्त निवड समितीने उमेदवाराची मुलाखत घेवून गोपनीयरित्या निवड समितीचा अहवाल मोहरबंद लिफाफयात सादर केलेला आहे. सदरचा लिफाफा सोबत जोडलेला आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७९ अन्वये गठीत केलेल्या वित्त व लेखाधिकारी या पदासाठीच्या निवड समितीचा अहवाल महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २०(१) (b) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयास्तव सादर).

**ठराव: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७९ अन्वये गठीत केलेल्या वित्त व लेखाधिकारी या पदासाठीच्या निवड समितीचा "उमेदवार योग्य नसल्याचा" अहवाल स्विकारण्यात आला. रिक्त असलेले वित्त व लेखाधिकारी हे पद शासनाकडून प्रतिनियुक्तीवर अधिकारी मागवून किंवा जाहिरातीद्वारे भरण्याची प्रक्रिया पुनश्चः करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ६(३) ] ट्रॅकसूट व क्रीडा किटस् खरेदीबाबत.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठामार्फत अखिल भारतीय आंतरविद्यापीठ, पश्चिम विभागीय व क्रीडा महोत्सव स्तरावरील स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना व मार्गदर्शक संघव्यवस्थापकांना ट्रॅकसूट व क्रीडा किटस् देण्यासाठी दैनिक लोकमत या वृत्तपत्रातून व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दि.१३/०५/२०१४ ते दि.०३/०६/२०१४ या कालावधीमध्ये जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार तीन फर्मच्या निविदा दि.१३/०६/२०१४ रोजी स्थानिक खरेदी समिती सदस्यासमवेत व निविदाधारकांच्या उपस्थित उघडण्यात आल्या व तुलनात्मक तक्ता करण्यात आला. त्याप्रमाणे सर्वात कमी दर असलेल्या निविदाधारकांना सदर कामाची निविदा मिळाल्याचे सांगण्यात आले. त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे.

उपरोक्त विषय दि.२७ जून, २०१४ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीत ठेवला असता ठराव क्र.३ अन्वये सदर साहित्य खरेदीची शिफारस करण्यात आली. वित्त व लेखा विभागाने सदर विषय येणाऱ्या वित्त व लेखा समितीच्या व व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात आला आहे.

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरीय विविध स्पर्धांना सुरुवात झालेली असल्याने व १ ऑगस्ट विद्यापीठ दिनी पदक विजेत्या खेळाडूंना ब्लेझर देवून सत्कार करावयाचा असल्याने सदरचे ट्रॅकसुट व क्रीडा किटस्, ब्लेझर विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे. त्यानुसार सोबतच्या तौलनिक तक्त्याप्रमाणे सर्वात कमी दर असलेले स्टर्लीग स्पोर्टस, बेळगाव समान दर असलेल्या फर्मबाबत विद्यापीठ व विभागाच्या सोईच होईल त्याप्रमाणे संबंधित फर्मकडून खरेदी करण्याचा पुरवठा आदेश द्यावा लागणार आहे.

तथापि, सदर विषयास व्यवस्थापन परिषदेची मान्यता नसल्यामुळे पुरवठा आदेश देता येत नाही, ही बाब विचारात घेवून महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील तरतूद १४(७) नुसार मा. कुलगुरुमहोदयांची मान्यता घेण्यात येवून संबंधित फर्मला पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

सबब, सादर केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

**ठराव: ट्रॅकसूट व क्रीडा किट्स खरेदीबाबत मा. कुलगुरुंनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ६(४) ] सोलापूर विद्यापीठाच्या कामासाठी शहरातील येणाऱ्या शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या स्थानिक भत्त्यात (Local Conveyance Allowance) वाढ करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी : सोलापूर शहरात एकूण अनुदानित व विनाअनुदानित ३९ महाविद्यालये कार्यरत असून, सदर महाविद्यालयातील शिक्षक/ प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणावर सदस्य/ अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत तसेच विद्यापीठातील कोणत्या ना कोणत्या अधिकार मंडळाच्या बैठकीस शिक्षक सतत विद्यापीठात येत असतात. तसेच महाविद्यालयातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी विद्यापीठाच्या कामासाठी येतात.

सोलापूर विद्यापीठ हे सोलापूर शहरापासून १० कि.मी. अंतरावर असून, शासनाने वेळोवळी पेट्रोल/ डिझेलचे भाव वाढ केल्यामुळे खाजगी वाहनांनी प्रवासाचे भाडे वाढविले असून, सध्या विद्यापीठ देत असलेला स्थानिक भत्ता रू.९०/- अत्यंत अपूरा व तूटपुंजी आहे. तरी आम्हाला स्थानिक भत्ता वाढवून मिळावा अशी तोंडी वारंवार मागणी स्थानिक महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी करत आहेत.

स्थानिक भत्त्याबाबत दि.१७/०७/२०१४ रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दूरध्वनीव्दारे संपर्क साधून चौकशी केली असता त्यांनी स्थानिक भत्ता विद्यापीठाच्या अध्यादेशानुसार रू.९०/- फक्त एवढाच अनुज्ञेय आहे असे सांगितले तर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे संपर्क साधले असता त्यांनी नांदेड शहरातील शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी रू.७०/- स्थानिक भत्ता अनुज्ञेय आहे असे म्हणाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे दूरध्वनी केले असता त्यांनी स्थानिक भत्ता रू.१५०/- इतका देत असतो असे कळविले तद्नंतर पुणे विद्यापीठ, पुणे येथे याबाबत विचारणा केली असता त्यांनी खास बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेमध्ये विषय ठेवून रू.३५०/- एवढा स्थानिक भत्ता अनुज्ञेय केला आहे असे सांगितले, कवी कुलगुरू कालिदास विद्यापीठ, रामटेक (नागपूर) येथे संपर्क साधले असता त्यांनी स्थानिक भत्ता रू.१००/- विद्यापीठाकडून दिले जाते असे कळविले.

सबब, उक्त वस्तूस्थिती अवलोकनी घेता प्रस्तुत विद्यापीठाच्या स्थानिक भत्त्यात वाढ करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: सोलापूर विद्यापीठाच्या कामासाठी शहरातून येणाऱ्या शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या स्थानिक भत्त्याच्या दरात (Local Conveyance Allowance) दि.०१ ऑगस्ट, २०१४ पासून रु.९०/- वरुन रु.१५०/- इतकी वाढ करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ६(५) ] प्रस्तुत विद्यापीठाकडून आदा करण्यात येत असलेल्या रिक्षा भाडे मध्ये वाढ करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाकडून आयोजित करण्यात येत असलेल्या वेगवेगळया प्राधिकरणाच्या बैठकासाठी बाहेर गावाहून येणा-या सन्मानीय सदस्यांना विद्यापीठाकडून आदा करण्यात येत असलेले रिक्षा भाडे खूपच कमी असल्याकारणाने संबंधीत प्राधिकरणाचे सदस्य विद्यापीठाकडे वारंवार नाराजी व्यक्त करीत आहेत. सध्यस्थितीत विद्यापीठाकडून बैठकीस उपस्थितीत असलेल्या सदस्यांना येण्याचे व जाणेचे असे मिळून रु-५०/- इतके रिक्षा भाडे मंजूर करण्यात येते.

सध्या मंजूर करण्यात येत असलेल्या रिक्षा भाडयामध्ये वाढ करणेबाबतच्या तोंडी सुचना ब-याच सन्मानीय सदस्यांनी विद्यापीठास दिल्या असून त्यामध्ये वाढ करावी लागणार आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८(फ) नुसार <u>फी व इतर आकार विहित करणेचे</u> अधिकार हे व्यवस्थापन परिषद या प्राधिकरणास आहेत.

सबब, उक्त बाब विचारात घेता सध्या मंजूर करण्यात येत असलेल्या रिक्षा भाडयाच्या दरामध्ये वाढ करण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः प्रस्तुत विद्यापीठाकडून आदा करण्यात येत असलेल्या रिक्षा भाड्यात दि.०१ ऑगस्ट, २०१४ पासून रु.५०/- वरुन रु.२००/- इतकी वाढ करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ६(६) ] विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक पुरविण्या संदर्भात पश्चिम महाराष्ट्र सुरक्षा रक्षक संघटना, कराड या मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः विद्यापीठामध्ये सुरुवातीपासून ठेकेदारामार्फत सुरक्षा रक्षक नेमण्यात येतात. सन २०१३-१४ साठी केलेले सुरक्षा रक्षकाचे कंत्राट दि.३१ मे, २०१४ रोजी पर्यंत होते. त्यापूर्वीच पश्चिम महाराष्ट्र सुरक्षा रक्षक संघटना, कराड यांचे दि.२०/०१/२०१४ चे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले. सदर पत्रान्वये त्यांनी शासन अधिसूचनेनुसार सुरक्षा रक्षकाची नेमणूक ही त्यांच्या संघटनेमार्फत करणे आवश्यक असल्याचे कळविले. त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या दि.२०/०५/२०१४ च्या पत्रान्वये त्यांना सुरक्षा रक्षक घेणे बंधनकारक असल्याबाबतचा शासन निर्णय, परिपत्रक अथवा पत्र सादर करण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार त्यांनी दि.२८/०५/२०१४ रोजीच्या पत्रासोबत कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मंबई यांच्या दि.२७/०५/२०१४ रोजीच्या शासन पत्राची छायांकित पत्र पाठविली. त्यातील परिच्छेद क्र.२ मध्ये खालील प्रमाणे मजकूर नमूद केला आहे.

*"सदरहू दि.८/११/२००६ रोजीच्या शासन निर्णय स्वयंस्पष्ट असून, विद्यापीठ हे सदरहू शासन निर्णयातील नमुद केलेल्या उपक्रमांपैकीच एक असल्याने त्यांनाही उक्त शासन निर्णयानुसार मंडळाचे नोंदित सुरक्षा रक्षक नियुक्त करणे बंधनकारक आहे."*

पश्चिम महाराष्ट्र सुरक्षा रक्षक संघटना, कराड यांचेकडून सुरक्षा रक्षकांच्या वेतनासंदर्भात माहिती मागतीली असता त्यांनी मा. सहाय्यक कामगार आयुक्त व अध्यक्ष, सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, सांगली यांचे दि.०३/०३/२०१४ चे आदेश ई-मेलद्वारे या कार्यालयास सादर केले. सदरचे आदेश सोबत जोडले असून त्या समवेत दि.२६/०२/२०१४ चे ठराव क्र.७ मध्ये सुरक्षा रक्षकास रु.७७४०/- इतके वेतन देण्याची तर दिनांक ०३-०३-२०१४ च्या आदेशात ४२% प्रचलित अधिभार देय असल्याची तरतूद आहे. ४२% प्रचलित अधिभार (लेव्ही) संदर्भात प्राप्त झालेली माहिती सोबतच्या तक्त्यात दर्शविण्यात आली आहे.

सबब, विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक पुरविण्या संदर्भात पश्चिम महाराष्ट्र सुरक्षा रक्षक संघटना, कराड या मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेण्यासाठीची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः सदरचा विषय शासन निर्णय व इतर कागदपत्रांसह पुढील बैठकीत पुनश्चः सादर करावा या बाबतीत अंतिम निर्णय होईपर्यंत सध्याची सिक्युरिटी व्यवस्था चालु ठेवावी असे सर्वानुमते ठरले.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **सचिव** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापन परिषद** | **व्यवस्थापन परिषद** |